Jagdamba Education Society's
# SANTOSH N. DARADE POLYTECHNIC, YEOLA
BABHULGAON, Tal. Yeola - 423 401, Dist. Nashik (Maharashtra)
❖ Approved by ▪ All India Council for Technical Education (AICTE) New Delhi
▪ Directorate of Technical Education (DTE)
❖ Affiliated to ▪ Maharashtra State Board of Technical Education (MSBTE) Mumbai
• Phone : (02559) 225002, 225006 • Fax : (02559) 225032 • Web. : www.sndpoly.com

Ref. No. SNDP/2024-25/25B. Date : 18 JAN 2025

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा अहवाल २०२५

संतोष एन. दराडे पॉलिटेक्निक आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा २०२५"** या उपक्रमाचे आयोजन दिनांक **१ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५** या कालावधीत करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे आणि त्यांना अभिवाचन, पुस्तक परीक्षण यांसारख्या कौशल्यांमध्ये प्रावीण्य मिळवून देणे हा होता.

**उद्घाटन समारंभ (६ जानेवारी २०२५) :**

या उपक्रमाचा उद्घाटन समारंभ **६ जानेवारी २०२५** रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर उपस्थित होते. त्यांनी वाचनाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले.

**वाचन कौशल्य कार्यशाळा (७ जानेवारी २०२५) :**

**७ जानेवारी २०२५** रोजी विद्यार्थ्यांसाठी वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रभावी वाचन तंत्र, समजून घेण्याची क्षमता वाढविण्याचे उपाय यावर मार्गदर्शन करण्यात आले.

**पुस्तक परीक्षण व अभिवाचन स्पर्धा (१३ जानेवारी २०२५) :**

**१३ जानेवारी २०२५** रोजी **पुस्तक परीक्षण आणि अभिवाचन स्पर्धेचे** आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या पुस्तकांचे परीक्षण सादर केले तसेच प्रभावी अभिवाचन केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या स्पर्धेला विशेष रंगत आली.

समारोप (१७ जानेवारी २०२५) :

हा उपक्रम १७ जानेवारी २०२५ रोजी यशस्वीरीत्या संपन्न झाला. या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांची मांडणी केली. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक केले आणि त्यांना भविष्यातही वाचनाची सवय कायम ठेवण्याचा सल्ला दिला.

निष्कर्ष :

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा २०२५" हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला. वाचनाची आवड निर्माण करणे, अभिवाचन आणि पुस्तक परीक्षण यांसारख्या कौशल्यांना चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता आणि तो यशस्वीरीत्या साध्य झाला. भविष्यात अशा प्रकारचे उपक्रम पुन्हा आयोजित करण्याची विद्यार्थ्यांनी मागणी केली.

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

18/01/25
LIBRARIAN
MR. MULANI U. D.
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

PRINCIPAL
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

Jagdamba Education Society's

# SANTOSH N. DARADE POLYTECHNIC,

Babhulgoan, Tal.YEOLA, Dist.Nashik (423401)

Approved By- All India Council For Technical Education (AICTE), New Delhi
Affiliated To- Maharashtra State Board Of Technical Education (MSBTE), Mumbai



## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

### वाचन पंधरवाडा (०१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५)

०६ जानेवारी २०२५
"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"
**उध्दाटन**

०७ जानेवारी २०२५
"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"
**वाचन कौशल्य कार्यशाळा**

**ठिकाण:**
**संतोष एन. दराडे पॉलिटेक्निक सेमिनार हॉल**

१३ जानेवारी २०२५
"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"
**पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा**

१७ जानेवारी २०२५
"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"
**पंधरवाडा उपक्रम समारोप**

Jagdamba Education Society's

# SANTOSH N. DARADE POLYTECHNIC,

Babhulgoan, Tal.YEOLA, Dist.Nashik (423401)

Approved By- All India Council For Technical Education (AICTE), New Delhi
Affiliated To- Maharashtra State Board Of Technical Education (MSBTE), Mumbai



## ग्रंथालय विभाग






## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"
## उध्दाटन

### अध्यक्ष: मा. जाधव यु.बी.

### स्थान: सेमिनार हॉल संतोष एन. दराडे पॉलिटेक्निक

### वेळ: १०:३० ते १२:००   दिनांक:०६ जानेवारी २०२५

Jagdamba Education Society's

# SANTOSH N. DARADE POLYTECHNIC,

Babhulgoan, Tal.YEOLA, Dist.Nashik (423401)

Approved By- All India Council For Technical Education (AICTE), New Delhi
Affiliated To- Maharashtra State Board Of Technical Education (MSBTE), Mumbai



## ग्रंथालय विभाग






## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

## वाचन कौशल्य कार्यशाळा

अध्यक्ष: मा. जाधव यु.बी.

स्थान: सेमिनार हॉल संतोष एन. दराडे पॉलिटेक्निक

वेळ: १०:३० ते १२:०० दिनांक:०७ जानेवारी २०२५

Jagdamba Education Society's

SANTOSH N. DARADE POLYTECHNIC,

Babhulgoan, Tal.YEOLA, Dist.Nashik (423401)

Approved By- All India Council For Technical Education (AICTE), New Delhi
Affiliated To- Maharashtra State Board Of Technical Education (MSBTE), Mumbai



ग्रंथालय विभाग






"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

## पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा

अध्यक्ष: मा. जाधव यु.बी.

स्थान: सेमिनार हॉल संतोष एन. दराडे पॉलिटेक्निक

वेळ: १०:३० ते ११:३० दिनांक: १३ जानेवारी २०२५

Jagdamba Education Society's

# SANTOSH N. DARADE POLYTECHNIC,

Babhulgoan, Tal.YEOLA, Dist.Nashik (423401)

Approved By- All India Council For Technical Education (AICTE), New Delhi
Affiliated To- Maharashtra State Board Of Technical Education (MSBTE), Mumbai



## ग्रंथालय विभाग



## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

## पंधरवाडा उपक्रम समारोप




अध्यक्ष: मा. जाधव यु.बी.

स्थान: सेमिनार हॉल संतोष एन. दराडे पॉलिटेक्निक

वेळ: १०:३० ते १२:०० दिनांक:१७ जानेवारी २०२५

# Sample Certificate

Jagdamba Education Society's

SANTOSH N. DARADE POLYTECHNIC,

Babhulgoan, Tal.YEOLA, Dist.Nashik (423401)

Approved By- All India Council For Technical Education (AICTE), New Delhi
Affiliated To- Maharashtra State Board Of Technical Education (MSBTE), Mumbai

DTE CODE : 5241 MSBTE CODE : 0583 ESTD : 2002



## Certificate of Appreciation

VACHAN SANKALP MAHARASHTRA 2025

This certificate is proudly presented to **UNDE SAMIKSHA RAVINDRA** for your enthusiastic participation in Vachan Sankalp Maharashtra, an initiative by the Government of Maharashtra in association with Santosh N. Darade Polytechnic,(Central Library) aimed at fostering a love for reading among students.

Your dedication to reading and commitment to learning exemplify the true spirit of knowledge and growth. We commend your efforts in embracing the joy of books and contributing to a culture of literacy. Congratulations on your achievement, and may your journey of reading continue to inspire and enlighten!

**Best wishes for your next reading journey!**

| Mr. MULANI U.D. | Mr. ASUDE S.R. | Mr. JADHAV U.B. |
|---|---|---|
| Librarian | Academic Coordinator | Principal |

# PHOTO





# PHOTO





# Prize Distribution




**$1^{St}$ Prize**

Name: Unde Samiksha Ravindra
Class: Second Year Computer Engineering
Book Title: अग्निपंख (Marathi)
Author: Dr. A.P.J. Abdul Kalam.




**$2^{nd}$ Prize**

Name: Sayyad Saniya Mohammad
Class: Second Year Computer Engineering
Book Title: गोष्ट पैश्या पाण्याची (Marathi)
Author: Prafulla Wankhede

# Prize Distribution




**3rd Prize**

Name: Navale Vaishnavi Gorakshnath
Class: Third Year Civil Engineering
Book Title: जिव्हाळा (Marathi)
Author: Sudhir Karkhanis.




**4th Prize**

Name: Band Vidya Rajendra
Class: Third Year Civil Engineering
Book Title: आई आणि इतर कथा (Marathi)
Author: Dr. Urushali Joshi

# Prize Distribution




**5Th Prize**

Name: Pagire Gayatri Harishchnadra

Class: First Year Computer Engineering

Book Title: Wings of Fire (English)

Author: Dr. A.P.J. Abdul Kalam



Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

(1)

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

## Central Library

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" (42)

Full Name: Unde Samiksha Ravindra

Class: Sy

Department: Computer

Mobile No: 9511643712

Book Title: अग्निपंख

Book Author: डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम

Name of Publisher: अरुण तिवारी

Year of Publication: 2000

1st

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

अग्निपंख हे अतिशय सुंदर पुस्तक आहे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे हे पुस्तक आहे. यामध्ये त्यांच्या जीवनातील संघर्ष व अनुभव वर्णिला आहे. यामध्ये कलाम यांची कौटुंबिक माहिती त्यांनी अहब केली पिडा त्यांनी लावलेला शोध सर्वकाही अत्यंत प्रशंसनीय आहे. हे केवळ अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र नसुन स्वतंत्र भारताच्या तंत्रज्ञान विषयक लढाईचे स्पंदन आहे.

हे पुस्तक फार प्रभावित करणारे आहे अग्निपंख हे पुस्तक आपल्याला आयुष्यातील संकटांशी लढण्यासाठी योग्य दिशा दाखवते. अग्निपंख या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर कलाम यांचा फोटो आहे. तर मलपृष्ठावर त्यांच्या विषयी थोडक्यात माहिती दिली आहे.

या पुस्तकातुन डॉ. कलाम यांनी आपल्या जीवनाचा आदर्श ठेवत तरुण पीढीला प्रगतिचा मार्ग दाखवला आहे. हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने आयुष्यात एकदातरी वाचावे हे प्रेरणादायी पुस्तक आहे.

डॉ. कलाम यांच्याबद्दल जाणुन घेण्याची उत्सुकता होतीच. माधुरी शानभाग यांनी अनुवाद केलेले अग्निपंख म्हणजे डॉ. कलाम यांचे आत्मचरित्र होय. प्रत्येक यशस्वी व्यक्तिमागे त्यांचा संघर्ष दडलेला असतो त्या संघर्षाचे वर्णन या पुस्तकात वाचायला मिळते त्यामधुन आपण आपल्या रोजच्या जिवनात कसे वागतो? व कस वागायला

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

पाहिजे ? धडा मोठा. चुका मी शिकले. डॉक्टर अब्दुल कलाम यांची एक गोष्ट मला खुप आवडली स्वप्न पाहणे व उच्च विचारसरणी तसेच स्वतः मध्ये असलेल्या अंतर्गत ज्ञानाशी एकरूप होणं म्हणजेच स्वतःशीच संवाद साधणे होय.

अशिक्षित कुटुंब व छोटेसे गाव या सर्वांमधून उंच भरारी घेऊन भारतरत्न हा सन्मान मिळवणारे व विज्ञान क्षेत्रात अमूल्य कामगिरी करणारे डॉ. कलाम हे माझ्या जीवनाचे आदर्श बनले आहेत त्यांचेच हे पुस्तक प्रत्येकानेच वाचले पाहिजे पुस्तक वाचणं म्हणजे आयुष्याला कलाटणी देणारी गोष्ट आहे.

मला या महावाचन उत्सव उपक्रमामुळे समजले हे उपक्रमामुळे राबवल्याबद्दल मी निदान माझ्या आवडीचे पुस्तक तर वाचले.

अग्निपंख हे पुस्तक त्यांच्या जीवनात उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रेरणा देण्यासाठी लिहिले गेले आहे. पुस्तक कलाम यांचे विचार तत्वज्ञान आणि जिवनातील अनुभव यांचे अनुकरण आहे. ज्यामुळे वाचकांना त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी नवा दृष्टिकोन मिळतो. पुस्तकाच्या सुरवातीला डॉ. कलाम यांच्या बालपणाचे वर्णन आहे. त्यांचा जन्म रामेश्वरम येथे एका साधारण कुटुंबात झाला त्यांच्या वडिलांनी त्यांना मेहनत प्रामाणिकपणा आणि सद्गुणीपनाचे धडे दिले.

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
**Santosh N. Darade Polytechnic**
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

रामेश्वरमच्या वातावरणात बालपण घालवल्यानंतर डॉ. कलाम यांनी आपल्या शिक्षणाच्या आणि करिअरच्या प्रवासात सुरुवात केली.

पुस्तकात त्यांच्या शिक्षणापासून ते इस्रो आणि आरडीओ या महत्त्वाच्या संस्थामध्ये केलेल्या कार्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे.

डॉ. कलाम यांना त्यांच्या जिवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. परंतु त्यांच्या आत्मविश्वासाने आणि ध्येयाच्या पूर्तीसाठी त्यांनी कधीही हार मानली नाही. त्यांच्या शैक्षणिक जीवनातील संघर्ष, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील योगदान, आणि यासकरून अग्निक्षेपणास्त्र प्रकल्पाची यशस्विता या सर्व गोष्टींनी त्यांच्या जीवनाचा प्रभावी भाग दाखवला आहे.

या पुस्तकाच्या प्रत्येक पानावर डॉ कलाम यांचे तत्वज्ञान आणि विचारधारा प्रकट दिसते. त्यांनी जिवनात साधेपणाचे महत्त्व, आत्मानुशासन आणि कठोर परिश्रम यांचा कायम आग्रह धरला. डॉ. कलाम यांचे जीवन म्हणजे एका सामान्य माणसाच्या असामान्य यशाची कथा आहे. त्यांच्या मतानुसार, आपण कुठून आलो हे महत्त्वाचे नाही, तर आपल्यात किती ताकद आहे आणि ती कशाप्रकारे वापरतो हे महत्त्वाचे आहे.

डॉ. कलाम यांच्या दृष्टिकोनातून शिक्षण हेच माणसाची खरी ताकद आहे. त्यांनी तरुणांना नेहमीच मोठे स्वप्न पाहण्यास आणि ते साध्य करण्यासाठी अपार मेहनत घेण्यास प्रवृत्त करते, ते म्हणायचे, "स्वप्न तेच, जे तुम्हाला झोपु देत नाहीत." या पुस्तकातुन डॉ. कलाम यांनी दिलेले संदेश वाचकांच्या मनात ठसतात.

अग्निपथ हे पुस्तक वाचतांना विज्ञानाच्या क्षेत्रातील महत्त्वपुर्ण कामगिरीची माहिती मिळते. त्यांच्या कार्याने भारताला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली. परंतु, त्यांच्या या यशापेक्षा, त्यांच्या व्यक्तिमहत्त्वातील साधेपणा, नम्रता आणि उच्च आदर्श वाचकांना अधिक प्रभावित करतात.

डॉ. कलाम यांनी आपल्या जिवनातील अनेक घटना सांगुन हे सिद्ध केले आहे. की, साधी सुरुवात असली तरी मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर मोठे यश मिळवता येते.

या पुस्तकातुन डॉ. कलाम यांनी एक नवी दिशा दाखवली आहे, जी तरुणांना त्यांच्या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन करते. त्यांच्या या पुस्तकाचे वैशिष्ट म्हणजे त्यांनी त्यांची कहाणी साध्या आणि स्पष्ट भाषेत मांडली आहे, ज्यामुळे प्रत्येक वाचकाला ते समजणे सोपे जाते.

"अग्निपथ" हे पुस्तक वाचकांना केवळ प्रेरणा देत नाही, तर त्यांना आपल्या जिवनात नवे उद्दिष्ट निश्चित करण्यास मदत करते.

हे पुस्तक केवळ वैज्ञानिकांसाठी नव्हे, तर प्रत्येक वाचकांसाठी प्रेरणादायी आहे, कारण यातून आपल्याला आयुष्य जगण्याची नवी दिशा मिळते.

या पुस्तकातुन डॉ. कलाम यांनी आपल्या जीवनाचा आदर्श ठेवत, तरुण पिढीला प्रगतीचा मार्ग दाखवला आहे. हे पुस्तक तरुणांनी नक्की वाचायला हवे.

LIBRARIAN
MR. MULANI U. D.
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

PRINCIPAL
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

(2)

00001

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

**Full Name:** Sayyad Saniya Mohammad

**Class:** Syco

**Department:** Computer

**Mobile No:** 8459622400

**Book Title:** Goshta paisha panyachi

**Book Author:** prafulla Wankhede

**Name of Publisher:** Sakal media Pvt. ltd. 595, Budwar peth, pune

**Year of Publication:** 2022

2nd

हे पुस्तक प्रफुल्ल वानखेडे यांनी लिहिले. हे पुस्तक 2022 मध्ये प्रकाशीत झाले. या पुस्तकातून लेखक आपल्यालासांगता की पैश्याचा गुणाकार कसा कराचचा हे शिकवता. खर तर ज्या लोकांना श्रीमंत व्हायचे आहे. आर्थिक दृष्ट्या बलकट करायचे आहे. त्या लोकांनसाठी हे पुस्तक खूप छानआहे.

माझ्या मते हे पुस्तक आपल्याला शिकवते पैश्याचा गुणाकार. आपल्याकडे असलेले पैसे टिकवायचे कसे, ते वाढवायचे कसे ते या पुस्तकात प्रफुल्ल वानखेडे 3 मुद्दयावर बोलले आहे. त्या 3 मुद्दयावर लेखकांनी त्यांच्या जीवनात घडलेले अनुभव सांगितले आहे. त्या 3 मुद्दयावर आपले आर्थिक दृष्टया कसे बलकट करायचे हे लेखक सांगतात.

पुस्तक वाचून मला काय वाटले :- हे पुस्तक वाचून मला अतिशय आनंद झाला. हे पुस्तक वाचतांना मला थोडा ही कंटाळा आला नाही. कारण या पुस्तकात लेखकांनी आ त्यांच्या जीवनात घडलेले अतिशय चांगले काही तरी शिकवून जाणारे असे अनुभव सांगितले आहे. हे पुस्तक वाचताना असे वाटते असे काही या तरुण उद्दोजकाच्या जीवनात घडले असेल त्यांना कसे वाटले असेल.

हे पुस्तक वाचतांना मला खूप आनंद झाला लेखकांनी अतिशय सोप्या भाषेत सांगितले आहे. की पैसा कसा वापरला पाहिजे, पैश्याची किंमत काय. पैश्याने माणुस कसा श्रीमंत होतो व व जास्त पैसा आला की माणुस त्याचा चांगला खूप उपयोग करतो पण जे व्यक्ती त्याचा चांगला उपयोग करत नाही ते लवकर गरीब ही होतात. तसेच या पुस्तकात काही प्रभावशाली वाक्य ही आहे जे खूप काही शिकवतात.

Inversetment करायच्या आधी आपल्याला बचतेची सवय कशी लागेल ते देखील या पुस्ताका-तून आपल्याला शिकायला भेटते.

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

### "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

बचती सोबत अनेक अशा गोष्टी असतात ज्याने करून आपले पैसे वायफट खर्च होत नाही आणि आणि त्या सोबतच आपला पैसा वाढायला मदत होते. या पुस्तकात असे अनेक मुद्दे मांडण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे.

त्या पुस्तकात लेखकांनी सांगितलेले उदाहरण जे मला खूप आवडले. काही जन काय करतात आपल्याकडे थोडे पैसे आले की त्याचा हाव येतो. ते पैसे लोकांना दाखवण्यासाठी खूप खर्च करतात. जसे की तुम्हाला पगार आहे 50,000 आणि तुम्ही गाडी घेतात 200000 ची आणि गाडी घेण्यासाठी तुम्ही लोन करतात का तर ते लोकांना दाखवण्यासाठी की माझ्याकडे किती पैसा आहे. असे दाखवणे काय श्रीमंती नाही असे लेखक म्हणतात. पैसे टिकवतांना बाकीच्या काही गोष्टी देखील लक्ष्यात ठेवल्या पाहिजे. बाकीच्या गोष्टी म्हणजे माणसात माणूस की असेल किंवा टाईम मॅनेजमेंट असेल किंवा आपण जे काम करतो त्यात आपल्याला आनंद आहे का त्यात आपल्याला समाधान आहे का या गोष्टी आपणाकुटेन कुठे शोधल्या पाहिजे असे लेखकांनी या पुस्तकात सांगितले आहे.

गुड विलचा फायदा कसा होतो, बचतीचा फायदा, सुंसंमत काढेवावी. Life inshurance का काढावा बचतीचा फायदा काय असतो संयम का ठेवावे हे संगळे काही या पुस्तकात लेखक सांगतात. हे पुस्तक वाचून आपण खरच समजून घेतले तर आपण खरच आर्थिक दृष्ट्या बळकट होण्याच्या मार्गावर जाऊ असे मला हे पुस्तक वाचून वाटले.

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

संयमाचे फायदे सांगताना लेखकांनी अतिशय सुंदर असे उदाहरण या पुस्तकात दिले आहे. त्या उदाहरणा प्रमाणे आपण जर आपल्या पैश्याची काळजी घेतली आपण आपल्या पैश्याची योग्य ठिकाणी गुंतवणुन करू शकु

तर अशा गोष्टी मधून हे पुस्तक आपल्याला भरपूर काही शिकवते. पुस्तकाचा शेवट होई पर्यंत या पुस्तकात लेखकांनी आपल्याला प्रवासाचा महत्व देखिल समजावून सांगितला आहे. प्रवास केल्याने त्या प्रवासातून आपल्याला सत्य समजते असे लेखकांनाचे वाक्य आहे. अशा अनेक गोष्टी मधून हे पुस्तक आपल्याला चांगल्या मार्गावर घेवून जाते. असे माझे वयक्तीक मत आहे.

या पुस्तकातील काही वाक्य ज्या ज्या वाक्या मुळे हे पुस्तक मला अधीक आवडले.

1 जर आपण पैसा जपला तरच पैसा आपल्याला जपतो

2 आपण काळा प्रमाणे किंवा मी तर म्हणेन रोज काही सकारात्मक बदल केले नाही तर अंत लवकर आहे.

3 माणसातला माणुसकी ही गुंतवणुक आयुष्यात सर्वोच्चित परतावा देतो

अशी ही काही वाक्य वाचून मला हे पुस्तक आवडले.

LIBRARIAN
MR. MULANI U. D.
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

PRINCIPAL
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

Jagdamba Education Society's

(3)

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

00003

## Central Library

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

**Full Name:** Navale Vaishnavi Gorakshnath

**Class:** Third year civil

**Department:** civil Engineering

**Mobile No:** 8766731487

**Book Title:** Jivhala (जिव्हाळा)

**Book Author:** Sudhir Kharkhanis

**Name of Publisher:** e-sahity Pratishthan

**Year of Publication:** 2024

3rd

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

"जिव्हाळा" कथेचे सारांश.....

'सुधीर करखानिस' यांनी लिहिलेल्या "जिव्हाळा" कादंबरीत मानवी नातेसंबंध, त्यामधील जिव्हाळा, संघर्ष, त्याग आणि कुटुंबातील एकात्मतेवर आधारित आहे. या कादंबरीत उर्मिला, समीर, सुमिल / सौमिल आणि चेतन ही पात्रे महत्त्वाची भूमिका निभवतात. या चार पात्रांच्या आयुष्याभोवती कादंबरी फिरते आणि त्यांच्या नातेसंबंधातील गुंतागुंतीचा आढावा घेताना जाणवते.

हि कथा एका छोट्याशा कुटुंबावर लिहीलेली आहे, जिथे उर्मिला, समीर, सौमिल आणि चेतन या चार व्यक्तींमधील नातेसंबंध, तणाव आणि जिव्हाळ्याचे विविध कंगोरे उलगडले जातात. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे वेगवेग-ळे विचार, स्वप्ने, आणि संघर्ष आहेत. समीर आणि सौमिल यांच्यातील वादामुळे कुटुंबात तणाव निर्माण होतो, तर उर्मिला आणि चेतन यांच्या सहनशीलतेमुळे तणाव निवळण्यास मदत होते.

मध्यवर्ती कल्पना:- या कादंबरीत समाजातील पारंपारीक आणि आधुनिक विचारांमधील संघर्ष, आर्थिक अडचणींमुळे येणाऱ्या समस्या, आणि मानवी नात्यांमधील गुंतागुंत यांचे प्रभावी चित्रण आहे. नात्यांमधील जिव्हाळा, त्याग, समर्पण, पारंपारिक आणि आधुनिक विचारसरणी हे सर्व घटक अत्यंत सुंदरतेने या कादंबरीत नमूद केलेले आहेत.

'जिव्हाळा' या कादंबरीतील उर्मिला ही एक संवेदनशील आणि कुटुंबवत्सल स्त्री आहे. तिचे स्वप्न आपल्या कुटुंबाला एकत्र ठेवण्याचे आहे, पण परिस्थितीमुळे तिच्या आयुष्यात अनेक अडचणी येतात. उर्मिला समीरवर खुप प्रेम करते पण त्यांच्या नात्यातील मतभेदांमुळे तिच्या आयुष्याला कलाटणी मिळते. ती कुटुंबासाठी स्वतःच्या भावनांचा त्याग करते. तिच्या संयमी स्वभामुळे ती सर्वांना जोडून ठेवते.

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

या कादंबरीतील समीर हा कुटुंबातील धडपड्या माणूस आहे. तो आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी मोठ्या जबाबदाऱ्या घेतो. मात्र, त्याच्या स्वभावातील कठोरपणा आणि निर्णय घेताना भावनांवर ताबा न ठेवणे यामुळे त्याच्यावर टिका होते. उर्मिलाशी असलेले नाते त्याच्या निर्णयामुळे ताणले जाते, पण तो मनाने कुटुंबासाठी समर्पित असतो. तसेच यातील सौमिल हा एक अनाथ मुलगा असतो. तो या कुटुंबाने दत्तक घेतलेला असतो. त्यामुळे तो कुटुंबात एक अनोखी आणि महत्त्वाची भूमीका बजावतो. आणि त्याच्या अनाथत्वामुळे त्याच्यात काही वेगळ्या प्रकरची संवेदनशीलता दिसते. तो आपल्या कुटुंबाशी जोडलेल्या असतो, पण त्याला स्वतःची ओळख निर्माण करायची असते. त्याच्या मनातील संघर्ष आणि स्वतःच्या आयुष्याबद्दलची असुरक्षितता कथेतील महत्त्वाचा पैलु आहे. सौमिल कुटुंबाच्या प्रेमामुळे समृध्द होतो परंतु त्याच्या अनाथतेमुळे कधीकधी तो स्वतःला या कुटुंबात परके समजतो. त्याचे अनुभव आणि त्याच्यातील परिवर्तन कादंबरीत मानवी नातेसंबंध आणि जिव्हाळ्याची ताकद अधोरेखित करतात. त्यानंतर चेतन दाखिले या कथेतील महत्त्वाचे पात्र आहे. चेतन हा कथेत सर्वात शांत आणि सामंजस व्यक्ती आहे. तो आपल्या बुध्दिमत्तेने आणि सहनशिलतेने कुटुंबातील तणाव कमी करण्याचा प्रयत्न करतो. चेतनला प्रत्येक सदस्याचा आदर आहे, आणि त्याच्या निर्णयामुळे कुटुंबाला काही कठिण प्रसंगावर मात करता येते.

कथेची मार्मिकता :-

~~कथेच~~ 'जिव्हाळा' या कांदंबरीचे लेखक श्री सुधीर कारखानिस यांनी या छोट्याशा कुटुंबातील सदस्यांमधील जिव्हाळा, प्रेम आणि त्याग याचे मार्मिक चित्रण केले आहे.

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

कुटुंबात मतभेद असुनही एकमेकांप्रती असलेला स्नेह ही कथेची ताकद आहे. आर्थिक ताणतणाव, सामाजिक संघर्ष, आणी व्यक्तीमत्वातील विविधता असुनही कुटुंब एकत्र राहण्यासाठी केले प्रयत्न कादंबरीचा महत्वाचा भाग आहे. यातुन त्यांच्यातील एकता अत्यंत मार्मिकतेने दिसते. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांसाठी केलेला त्याग आणी संघर्ष आणी त्यातुन उभे राहणारे नातेसंबंध कथेचे हृदय आहे.

समाजातील पारंपरिक मूल्ये आणी बदलत्या काळानुसार येणारी आधुनिक विचारसरणी यांच्यातील संघर्ष कादंबरीत दिसतो. विशेषत: नवीन पिढीचे स्वप्न आणी जुन्या पिढीचे विचार यातून होणारी ताणतणावाची स्थिती प्रभावीपणे मांडली आहे.

बोध / संदेश "जिव्हाळा" या हृदयस्पर्शी आणी भावनात्मीक कादंबरीत नात्यांचे मर्म रेखाटले आहे. कादंबरी शेवटी कुटुंबातील जिव्हाळ्याचा महत्वपुर्ण संदेश देते. कितीही अडचणी येवोत, प्रेम, एकमेकांवरील विश्वास, आणी त्याग यामुळे कुटुंब टिकुन राहते आणी संकटांवर मात करण्याचे सामर्थ्य निर्माण होते. या कादंबरीतुन आपल्याला कुटुंबातील एकतेचा आणि जिव्हाळ्याचा महत्त्वपुर्ण संदेश देते.

LIBRARIAN
MR. MULANI U. D.
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

PRINCIPAL
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

00005

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

**Full Name:** Vidya Rajendra Band.

**Class:** TYCE.

**Department:** Civil

**Mobile No:** 8999173626

**Book Title:** Aai Ani Itar katha (आई आणि इतर कथा).

**Book Author:** somerset mom (सॉमरसेट मॉम).

**Name of Publisher:** Dr. Vrushali joshi (डॉ. वृषाली जोशी).

**Year of Publication:** 26 January 2024 (२६ जानेवारी 2024).

4th

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

"आई आणि ईतर कथा"

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

"आई" ही Somerset Maugham यांच्या "आई आणि इतर कथा" या संग्रहातील एक अत्यंत गहिरी आणि विचारप्रवर्तक कथा आहे. या कथेचे मुख्य पात्र एक तरुण स्त्री आहे, जिने आपल्या आईच्या कठोर आणि नियंत्रक वागणुकीतून जीवन काढले आहे. कथा आईच्या प्रेम, त्याग कठोरतेच्या गहन परिभाषेला उलगडते. मुख्य पात्र, जेव्हा लहान होती, तेव्हा तिच्या आईच्या अत्यंत कठोर प्रेमामुळे ती नेहमीच त्रासली जात होती. तिच्या आईचे प्रेम तिला अगदी तपासले गेले होते, आणि आईचे नियंत्रण, तिच्या कर्तव्यातून, मुलीला अत्यंत वेदना देत होते.

आई आपल्या मुलीला केवळ कडक शिक्षण देण्याच्या उद्देशाने सर्व गोष्टी करत होती. तिचा विश्वास होता की जीवनात कष्ट आणि संघर्ष घेऊनच यश प्राप्त करता येईल. आईच्या दृष्टिकोनानुसार, मुलीला नेहमीच कडक वर्तनात ठेवणे आवश्यक होते. कथेतील मुलगी जरी आईच्या कठोर प्रेमाला व समजून घेत असली तरी, हळूहळू तिला समजत जाते की आईचे प्रेम हे तिच्या भविष्यासाठी आणि जीवनाच्या कठोरतेसाठी आवश्यक आहे. कथा हळूहळू त्या मुलीच्या अंतर्गत बदलांची आणि तिच्या विचारांची छान तपासणी करते. ती शिकते की आईचे कठोर प्रेम कधी कधी तिच्या स्वतःच्या इच्छांवर आणि भावनांवर प्रगट होत असले तरी, ते खरे प्रेम आहे. आईचा त्याग आणि तिचे कठोर निर्णय, जरी त्या वेळेस दुःखकारक असले तरी, त्या मुलीच्या भविष्यासाठी ते अत्यंत आवश्यक होते. त्या कठोरतेमुळेच तिच्या जीवनात एक

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

गोष्टीचे ज्ञान निर्माण होते की आयुष्य कधीही सोपे नसते आणि त्यात संघर्षाची आणि धैर्याची आवश्यकता असते.

कथेचा मुख्य संदेश हाच आहे की आईचे प्रेम कधीहि अपरिहार्य असते. आणि जरी ते प्रेम कठोर आणि त्यागयुक्त असले तरी त्याच्यामागे नेहमीच एक शुद्ध हेतू असतो. आपल्या मुलीच्या भविष्यासाठी आईने घेतलेले कठोर निर्णय हे तिच्या भल्यासाठीच असतात. आणि हाच संदेश कथेच्या शेवटी आपल्या मनाला ठासून जातो.

कथेतील अंतिम भागांमध्ये, मुलीला आईच्या कठोर प्रेमाच्या मागे असलेल्या त्याग आणि काळजी समजते. ती तिच्या आईच्या प्रयत्नांच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या कष्टांची आणि बलिदानाची कदर करते. त्यामुळे, हळूहळू तिचा दृष्टीकोन बदलतो आणि ती आपल्या आईच्या कर्तृत्वाला आदर देताना तिच्या प्रेमाचे खरे मूल्य समजून घेते.

कथेतील आईचा दृष्टीकोन मुलीला तिच्या आयुष्याशी संबंधित एक नवा दृष्टीकोन देतो. लहानपणी जी मुलगी आपल्या आईच्या कठोरतेला सहन करत होती, ती मोठी होताच तिच्या आयुष्यातला सर्व संघर्ष तिला समजायला लागतो. आणि जेव्हा ती आईच्या धाडसाच्या आणि प्रेमाच्या गहराईला समजून घेते, तेव्हा तिच्या अंतर्मुखतेचा भागही स्पष्ट होतो. कथेचा गाभा हाच आहे की, प्रेम आणि त्याग हे कोणत्याही नात्याच्या गाभ्यात असायला हवे, आणि आईचे प्रेम नेहमीच मुलांच्या कल्याणासाठी असते, जरी ते कठोर आणि अपरिहार्य असले तरी.

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

निष्कर्ष :-

कथेचा मुख्य संदेश हा आहे की आईचे प्रेम आणि त्याग त्याचे मूल्य वेळेमध्ये वेळोवेळी समजून घेणे आवश्यक आहे. आई, जरी कठोर वाटत असली तरी, तिचे प्रेम आणि कठोरता मुलांच्या भल्यासाठी असतात. मुलींना केवळ शिस्त आणि संस्कार देणे ही आईची भूमिका आहे, आणि ते कठोर प्रेम त्यांच्या भविष्याशी संबंधित असते. कधी कधी, कठोर प्रेमाच्या मागे एक गहिरा हेतू असतो. मुलाला जीवनातील कठीण प्रसंगांचा सामना करण्यासाठी सक्षम बनवले. त्यामुळे, कथेचा शिक्षाप्रद संदेश हा आहे की आपल्याला जीवनात प्रेम आणि त्याग हे अत्यंत महत्त्वाचे असतात, आणि त्या प्रेमाचे खरे मूल्य कधीतरी समजून घेतले पाहिजे.

LIBRARIAN
MR. MULANI U. D.
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

PRINCIPAL
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

(5)

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

00036

**Full Name:** Gayatri Harishchandra Pagire.

**Class:** FYCO.

**Department:** Computer.

**Mobile No:** 9604497911

**Book Title:** "Wings of Fire."

**Book Author:** A.P.J Abdul Kalam.

**Name of Publisher:** Scholastic Inc.

**Year of Publication:** 1999

5th.

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

Reading "wings of Fire" is a deeply inspring and motivating experiance, offering a firsthand account of Dr A.P.J Abdul kalam's life journey from humble beginnings to be coming a promient scientist and the President of India, filled with valuable lesson on perseverance, hardwork, and dedication to achieving one's dreams; the book is particularly impactful due to its straightforward writing style, where Kalam shares personal anecdotes and insights into his struggles and triumphs, making it relatable to readers of all background. The book is a testament to the power of dreams and the potential to overcome challenges through focused determination, showcasing Kalam's unwavering commitment to india's scientific advancement. While primarily focused on his professional achievements, Kalam shares personal stories and reflection on his upbringing, family, and mentors, adding depth to his characters.

The language is simple and straightforward, making it easy for readers of all levels to understand and engage with the content. Readers gain valuable insights into the development of India's space research program, including Kalam's significant contributions to project like the Satellite Launch vehicle.

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik (423401)

## Central Library

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

After Reading my feeling empowered and motivated to pursue their own goals after reading "Wings of Fire". due to Kalam's positive outlook and unwavering belief in the potential of individuals.

The first part of book, "Orientation," introduces the reader to kalam's childhood and early education. Kalam grew up in a humble family and faced many challenges in pursuing his education, he remained determined to succeed and went on to study aerospace engineering. The Second part of the book, "Creation", focuses on kalam's career as a scientist and his contribution to india's space and missile programs. He also discusses the challenges he faced during his tenure as the Chief Scientific Adviser to the Indian government. The third part of the book, "propitiation," reflects on kalam's spiritual and philosophical beliefs. He discusses the importance of spirituality in his life and how it helped him through difficult times. The fourth and final part of the book, "Contemplation", looks back on Kalam's life and the lessons he learned along the way. He shares his thoughtful on leadership, education, and the role of science and technology in society.

The main message of "Wings of Fire" is one of perseverance and inspiration. It was really motivating book I have ever read.

LIBRARIAN
MR. MULANI U. D.
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

PRINCIPAL
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

PRINCIPAL
S.N.D. POLYTECHNIC
YEOLA-423401 (NASHIK)

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK